नियमित दिवाणी दावा क्र.२४/२०२१
मुजाहेद वि. मुबारक
सी.एन.आर.क्र.एम.एच.जे.न.०८०००१३६२०२१

**निशाणी क्र.०९ खालील आदेश**
(दिनांक २२/११/२०२१)

प्रस्तुत अर्ज वादीने न्यायालयीन आयुक्त नेमणुक होणेकरीता केलेला आहे.

२) वादीने असे कथन केले की, मौजा घनसावंगी येथील गट क्र.२९२ ची मोजणी करण्याबाबत भूमी अभिलेख कार्यालय, घनसावंगी यांना अर्ज दिला होता. परंतु, त्यांनी मोजणी केली नाही. वादीने असे कथन केले आहे की, प्रतिवादीने वादीच्या मालकी व ताब्यातील शेतजमीनीच्या दक्षिण बाजुने ००हे. २० आर एवढे अतिक्रमण केले आहे. ते अतिक्रमण काढून वादीस तेवढया क्षेत्राचा ताबा प्रतिवादीकडून मिळावा याकरीता दावा दाखल केला आहे. वादीच्या ताब्यात असलेल्या क्षेत्राचा व शेजारील शेतजमीनीची मोजणी करण्यात येवून अहवाल न्यायालयात दाखल करावा, याकरीता प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. दावा एकतर्फा प्रतिवादीविरूध्द चालविण्यात आलेला आहे. प्रतिवादीने अर्जाचे म्हणणे दाखल केलेले नाही.

३) अर्जाचे अवलोकन केले. प्रस्तुतचा दावा हा अतिक्रमणीत जमीन म्हणजे ००हे. २० आर क्षेत्राचा ताबा मिळण्याबाबत दाखल केलेला आहे. वादीने दाखल केलेल्या गट क्र.२९२ च्या ७/१२ चे अवलोकन केले असता, वादीच्या नावे ०हे. ७० आर एवढी जमीन आहे व प्रतिवादीच्या नावासमोर १हे. ०० आर एवढी जमीन असल्याचे दिसून येते. प्रस्तुत अर्जान्वये वादीने जमीन गट क्र.२९२ मधील अतिक्रमणीत क्षेत्र निश्चित करणेसाठी न्यायालयीन आयुक्त यांची नियुक्तीची विनंती केली आहे. सदर बाब लक्षात घेता, न्यायालयीन आयुक्ताची नियुक्ती केल्यास निश्चितच दाव्याच्या परिणामकारक निकालासाठी व उभयपक्षातील वादाचे संपूर्ण निराकरण करण्यासाठी मदत होईल. तसेच, सदर न्यायालयीन आयुक्तची मागणी ही पुरावा गोळा करण्यासाठी केलेली दिसुन येत नाही. करीता, सदरचा अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. म्हणून खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

## आदेश

| | |
|---|---|
| १ | तालुका निरिक्षक, भुमी अभिलेख कार्यालय, घनसावंगी जि. जालना यांना सदर प्रकरणात न्यायालयीन आयुक्त म्हणुन नियुक्त करण्यात येत आहे. |
| २ | न्यायालयीन आयुक्ताने मौजे घनसावंगी, ता. घनसावंगी जि. जालना येथील गट क्र.२९२ या मिळकतींच्या संपूर्ण क्षेत्रफळाची मोजणी भूमापन संहिते अन्वये करावी व मोजणी नकाशा तयार करुन सविस्तर मोजणी अहवाल न्यायालयात दिनांक २३/१२/२०२१ पावेतो सादर करावा. |
| ३ | मोजणीसाठी आवश्यक दस्तऐवज पुर्तता उभयपक्षांनी तात्काळ करावी. |
| ४ | न्यायालयीन आयुक्ताचा आवश्यक तो खर्च वादीने सोसावा व तो खर्च भूमी अभिलेख कार्यालय, घनसावंगी येथे भरावा. |
| ५ | न्यायालयीन आयुक्त नियुक्तीची पत्र देण्यात यावे. |

स्वाक्षरीत/-

दिनांक. २२/११/२०२१

(**स. भा. शिरसाठ**)
दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),
घनसावंगी

## प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, पी.डी.एफ. फाईल मधील शब्द न शब्द मुळ निकालपत्र प्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नाव : एम. डी. आढे
न्यायालयाचे नांव : प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालय क्र.१, घनसावंगी
दिनांक : २५/११/२०२१

सही /-
एम. डी. आढे
(लघुलेखक ग्रेड-३)